**नियमित दिवाणी दावा क्र. २४३/२०२४**

**<u>निशाणी क्र. ३३ वरील आदेश</u>**

अर्जातील कथन वाचले. वादी तर्फे विधीज्ञ श्री. के. एम. घाडगे व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. सागडे यांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

२. सदरचा दावा वादी यांनी दावा मिळकतीचे ठरावाकरिता, वाटपाकरिता व ताकीद हुकूमाकरिता दाखल केला आहे.

३. वादी असे कथन करतो की, दावा मिळकतीमध्ये ऊसाची लागवड केलेली होती व आहे. ऊस काढणीस आल्यावर प्रतिवादी यांनी सदरचा ऊस पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूर येथे जमा केला होता व त्याचे बिल अंदाजे १५,००,०००/– रुपये जमा होणार आहे. सदरची रक्कम प्रतिवादी क्र.२ स्वतः हडप करण्याच्या तयारीत आहेत. सदर उत्पन्नात वादी यांचा हिस्सा आहे. त्यामुळे ऊसाची रक्कम कोर्ट रिसीव्हर यांनी स्वीकारुन या दाव्याच्या कामी जमा करणेबाबत अर्जाप्रमाणे आदेश व्हावेत व रकमेबाबत आहे ती परिस्थिती ठेवावी अशी विनंती केली आहे. तसेच भूमापन क्र.७१७/अ या संपूर्ण आर.सी.सी. घरजागेचे कब्जा व मालकी विषयी प्रतिवादी विरोधात 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचे आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले व सदरचा अर्ज संपूर्णतः नाकारला आहे. ते असे कथन करतात की, दावा मिळकती या प्रतिवादी यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. त्यामुळे सदर मिळकतीमधून येणा–या उत्पन्नामध्ये वादी यांचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांना सदरच्या उत्पन्नाबाबत 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याची दाद मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्ज, प्रतिज्ञापत्र व दाव्यासोबत दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने दावा मिळकतीमध्ये किती ऊस होता. सदरचा ऊस गळीतासाठी

कोणत्या कारखान्यात गेला आहे, कधी गेला आहे, त्याचे किती बिल थकित आहेत याबाबत कोणताही खुलासा अभिलेखावर दाखल केलेला नाही. मोघमपणे पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूर यांच्याकडून १५,००,०००/- रुपये जमा होणार आहेत असे नमूद केले आहे. परंतू सदर बाबतीत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे आजच्या परिस्थितीत प्रतिवादी यांच्याविरुध्द जैसे थे परिस्थिती ठेवणे उचित नाही. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

वादी यांचा 'जैसे थे' चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

PRIYANKA NAMADEV PATHADE

Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE
Date: 2024.06.13 17:16:10 +0530

**(पी.एन.पठाडे)**

दिनांकः- १२.०६.२०२४ ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

पंढरपूर.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 12.06.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 12.06.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 13.06.2024 |